# जिल्हा परिषद ठाणे

अर्थ विभाग

अर फिट होम्स, प्लॉट नं १०६/१०७/एस.जी. बर्वे रोड, वागळे इस्टेट एम आयडीसी, ठाणे (पश्चिम) ४००६०४

Email-fdzpthane@gmail.com, Website-zpthane.maharashtra.gov.in. Ph. No-०२२-२५३३५१०८


**अर्थ विभाग जिल्हा परिषद ठाणे**

**जिल्हा परिषदे मधील निरुपयोगी वस्तुंचा जाहीर लिलाव सूचना.**

सर्व जनतेच्या माहितीसाठी या सूचनेव्दारे जाहीर करण्यात येते की, ठाणे जिल्हा परिषद मालकीच्या तसेच ताब्यातील निरुपयोगी विनावापर भंगार वस्तूची जाहीर लिलावाव्दारे दिनांक १६/१०/२०२४ वेळ दुपारी १२.०० पासून पासून खालील दिलेल्या ठिकाणी भंगार वस्तूची विक्री करावयाची आहे.

| अ.क्र. | विभागाचे नावं | लिलावाव्दारे निकालात काढावयाचे एकुण साहित्य | लिलावाची दिनांक | वस्तु पहावयाचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | वित्त विभाग जिल्हा परिषद ठाणे भांडार शाखा | कार्यालयीन संगणक मॉनिटर ,यु. पी. एस. | १६/१०/२०२४ | जिल्हा परिषद ठाणे भांडार शाखा दि. ७/१०/२०२४ ते १५/१०/ २०२४ |

लिलावाच्या अटी व शर्ती सविस्तरपणे जिल्हा परिषद,ठाणेच्या zpthane.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर किंवा कार्यालयामध्ये कार्यालयीन दिवशी दिनांक ७/१०/२०२४ पासून पाहावयास मिळेल. त्याप्रमाणे उपरोक्त साहित्य लिलावाचे दिवशी व ठिकाणी वितरीत करुन वाचून दाखविण्यात येईल.

तरी इच्छुक बोलीदाराने लिलावाचे तारखेस व वेळी उपस्थित राहावे.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेनुसार

**मुख्य लेखा व वित्त अधिकारी,**
**जिल्हा परिषद ठाणे**

अर्थ विभाग
जिल्हा परिषद ठाणे

# भंगार निरुपयोगी लिलावाच्या शती व अटी.

१. सक्षम अधिकारी यांचे वतीने निर्लेखन करण्यात येत आहे. त्या अधिका-यास निर्लेखनाची समिती नेमण्याचा अधिकार राहील. समितीचे देखरेखी खाली निर्लेखनाची कार्यवाही होईल व निर्लेखनाचे ठिकाणी समितीचा निर्णय अंतिम राहील.

२. इच्छूक बोलीदारांना लिलावात काढलेले साहित्य लिलावापुर्वी आठ दिवसा पासून पाहवयास मिळतील बोलीदारांनी मालाची तपासणी केली आहे. असे गृहीत धरण्यात येऊन नंतर मालाबाबत कोणतीही तक्रार स्विकारली जाणार

३. कोणत्याही बोलीदाराची बोली कारणाशिवाय स्विकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अधिकार समितीस राहील समितीने घेतलेला निर्णय हा अंतिम निर्णय राहील.

४. लिलावात बोली बोलण्यापुर्वी रु. २०००/- ची अनामत रक्कम जमा करावी लागेल त्याशिवाय बोलीमध्ये भाग घेता येणार नाही.

५. सर्वाधिक बोली बोलणाऱ्या इसमास लिलाव अधिकाऱ्याकडे यशस्वी बोलीच्या ५० टक्के इसारा किंवा पूर्ण रक्कम रोखीने त्वरीत भरावी लागेल ती न भरल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व सदर बोली रदद करण्यात येऊन मालाचा पुन्हा लिलाव करण्यात येईल.

६. लिलाव केल्यानंतर व लिलाव कायम केल्याबद्दल बोलीदारास कळविण्यात आल्यापासुन ५ दिवसाचे आत उर्वरीत रक्कमेचा भरणा करणे आवश्यक आहे. उर्वरीत रक्कम १० दिवसांच्या मुदतीत न भरल्यास १३ टक्के दराने व्याज आकारण्यात (व्याज प्रती दिन परिगणीत करावयाचे आहे) येईल अशी एकुण १५ दिवसाचे आत उर्वरीत रक्कम न भरल्यास अनामत रक्कम व इसा-याची रक्कम जप्त करण्यात येईल विक्री रद्द करण्यात येईल

७. बोलीदाराने पूर्ण रक्कमेचा भरणा केल्यावर संबंधित साहित्य जिल्हा परिषद ठाणे भांडार शाखा येथे १० दिवसाचे आंत कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत ताब्यात घ्यावे. तदनंतर प्रतिदिन रु. १००/- (रु. शंभर फक्त) दंड आकारण्यात येईल. ३० दिवसाचे आत माल ताब्यात न घेतल्यास समितीला लिलाव रद्द करण्याचा अधिकार राहील संबंधित लिलाव खरेदीदाराची अनामत रक्कम व ३०दिवसाची दंडाची रक्कम वसुल करुन उर्वरीत रक्कम परत करण्यात येईल.

८. लिलाव खरेदी दराने माल ताब्यात घेतांना जिल्हा परिषदेच्या / इमारतीचे / मालमत्तेचे नुकसान जवाबदार धरण्यात येवून नुकसान भरपाई वसूल करण्यात येईल.

९. यशस्वी बोलदाराला विकत घेतलेले साहित्याचे खरेदीच्या रक्कमेवर नियमानुसार विक्रीकर, व्हॅट व इतर सर्व प्रकारचे कर व शुल्क भरणे आवश्यक राहील. कोणतेही सुट मिळण्याचे प्रमाणपत्र लिलाव खरेदीदाराला मिळणार नाही.

१०. एकदा जाहीर केलेल्या साहित्याचा लिलाव कोणतेही कारण न देता वेळेवर स्थगित करण्याचा अधिकार लिलाव समितीस असतील.

११. यशस्वी बोलीदाराची रक्कम सोडून इतर बोलीदराची अनामत रक्कम शक्यतोवर त्याच दिवशी परत करण्यात येईल.

१२. जाहीर लिलावात जर समितीने ठरविलेल्या किमान वाजवी किमती पेक्षा कमी किंमत येत असल्यास नव्याने जाहीर लिलाव करण्याचे अधिकार समितीस राहील.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेनुसार

मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
जिल्हा परिषद ठाणे

Scanned with OKEN Scanner